# मा.आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रचारात आघाडी; 'एकच वादा प्रशांतदादा' घोषणेने गावोगाव दणाणले

पनवेल(प्रतिनिधी) 'एकच वादा प्रशांतदादा' घोषणेने पनवेल विधानसभा मतदार संघातील गावोगाव दणाणून सोडले जात असून विकासाचा झंझावात कायम ठेवून पनेवलला सर्वांगिण विकासाचे रूप देणारे विकासपुरूष व भाजपाचे उमेदवार आणि कार्यसम्राट मा.आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रचारात आघाडी मारली आहे.

अवघ्या पाच वर्षात सहाशे कोटींहून अधिक रूपयांची शेकडो विकासकामे करून पनवेलच्या जनतेला सोयी सुविधा देण्याचे आणि पनवेलसह राज्यातील विविध प्रश्नांना शासन दरबारी वाचा फोडण्याचे काम करणारे कर्तव्यदक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रचारार्थ चिपळे, भोकरपाडा, बोनशेत, विहीघर, कोप्रोली, नेरेपाडा, नेरे, आंबिवली, वांगणी, भानघर, सांगटोली, उमरोली आदी गावांमध्ये दौरा झाला. कडक उन्हाचा तडाखा असताना यावेळी विकासपुरूष प्रशांत ठाकूर यांच्या स्वागतासाठी त्या-त्या गावांच्या प्रवेशव्दारावर मोठया प्रमाणात गर्दी पहायला मिळत होती. कार्यकर्ते व ग्रामस्थांकडून प्रशांत ठाकूर यांचा जयजयकार व फटाकाऱ्यांच्या आतषबाजीत जोरदार स्वागत होत असताना चौका-चौकात महिलांकडून मा.आमदार प्रशांत ठाकूर यांचे औंक्षण केले जात होते. यावेळी मा.आ.प्रशांत ठाकूर यांनी ज्येष्ठांना नम्रपणे नमस्कार करून त्यांचे आशिर्वाद घेतले. याप्रसंगी कार्यकर्त्यांनी एकच वादा प्रशांतदादा, भारतीय जनता पार्टीचा विजय असो, प्रशांत ठाकूर आगे बढो हम तुम्हारे साथ है, अशा अनेक गगनभेदी घोषणांनी परिसर दुमदुमला सोडला होता.

या दौऱ्यात ॲड.आशा भगत, युवा नेते संजय पाटील, सुरेश घनसोलकर, विलास फडके, मिननाथ फडके, वासुदेव गवते, सुनिल पाटील, भास्कर फुलोरे, गोटीराम फडके, रमेश पाटील, राजेश भोईर, कांता फडके, आंबो रोडपालकर, महेंद्र माळी, अमित गवते, राकेश गवते, प्रशांत पाटील, रूपम गवते, प्रशांत पाटील, मयुर पाटील, उमेश पाटील, आकाश गवते, प्रमोद घनसोलकर, अजित गवते, माया म्हात्रे, स्वराज गवते, राज पाटील, माया फुलोरे, अशोक फुलोरे, जोमा फुलोर, कुंडलिक फुलोरे, अविनाश पाटील, काशिनाथ फुलोरे, गोटीराम फुलारे, वामन फुलारे, गणेश फुलोरे, गंगाराम फुलोरे, नामदेव फुलोरे, जगन फुलोरे, रमेश फुलोरे, महेंद्र भगत, हरिश्चंद्र भगत, मिथून पाटील, जगदिश पाटील, दिनकर पाटील, तुकाराम पाटील, संतोष पाटील, मच्छिंद्र पाटील, भरत पाटील, राजेंद्र फडके, तुकाराम फडके, रवि फडके, संदीप पाटील, अनंता पाटील, सविता पाटील, रंजना मढवी, राजश्री मढवी, राज फडके, प्रदीप फडके, बाळकृष्ण खुटले, जनार्दन खुटले, हिरामण खुटले, दत्तात्रेय खुटले, बाळाराम खुटले, नाना खुटले, बाळकृष्ण म्हात्रे, शाळीक म्हात्रे, ज्ञानेश्वर म्हात्रे, हरिश्चंद्र म्हात्रे, कृष्णा गायकर, विलास म्हात्रे, परशुराम रोडपालकर यांच्यासह शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले होते.